# ३. राष्ट्रीय सत्ता

प्रश्न १. राष्ट्रीय सत्तेच्या व्याख्या सांगून निर्धारक घटक स्पष्ट करा.

आंतरराष्ट्रीय संबंधातील राष्ट्रीय सत्ता ही एक अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. राष्ट्रीय सत्ते भोवतीच संपुर्ण आंतरराष्ट्रीय राजकारण फिरत असते. जगातील सर्वच देश राष्ट्राची सत्ता वाढवण्याचा जोपासन्याचा व तिचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात. राजकारण हा सत्तेचा खेळ असतो. या सत्तेच्या खेळात सहभागी असणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला सत्तेची आवश्यकता असते. राष्ट्राच्या सत्तेवरच प्रत्येक राष्ट्राचा दर्जा ठरतो. सत्ता हे सामर्थ्याचे शास्त्र असते राष्ट्राची सत्ता निर्माण करता येत नाही. तर ती आपोआप निर्माण होते असे मॉर्गेनथॉ म्हणतो.

कौटील्य, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकेव्हली, थॉमस हॉब्ज, हेगेल, रॉबर्ट डाल, हेरॉल्ड लॉस्वेल, कॅटलीन, चार्ल्स मेरियम या सर्वांनी सत्ता या संकल्पनेविषयी सखोल चिंतन केले. 'Politics among Nations' या ग्रंथात मॉर्गेनथॉ ने सत्ता संकल्पनेविषयी वास्तववादी दृष्टीकोन मांडला.

* राष्ट्रीय सत्तेच्या व्याख्याः-

राष्ट्रीय सत्ता ही एक व्यापक संकल्पना आहे. राष्ट्राच्या सत्तेचे अस्तित्व विविध घटक व पातळ्यांवर अवलंबून असते. आर्थिक सत्ता, सामाजिक सत्ता, राजकीय सत्ता, धार्मिक सत्ता, व्यक्तीची सत्ता, संस्थेची सत्ता, कायद्याची सत्ता अशा विविध रूपात राष्ट्राची सत्ता असते. याचा अर्थ सत्ता ही अनुभवजन्य संकल्पना आहे. देश, काळ, स्थळ व परिस्थितीनुसार सत्ता बदलत असते. गतिशील असणा-

च्या सत्तेच्या व्याख्या खालील प्रमाणे सांगता येतील
1) मॉर्गेन यांच्या मते :- " एका व्यक्तीद्वारे इतर व्यक्ती किंवा समुहाच्या मन, विचार व कृतीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया म्हणजे सत्ता होय."

2) हार्टमन च्या मते :- " सत्ता म्हणजे राष्ट्रीय हित साध्य करण्याची क्षमता होय."

3) अब्राहमच्या मते :- " निर्णय प्रक्रियेतील सहभाग म्हणजे सत्ता होय."

4) रॉबर्ट डाल च्या मते :- "सत्ता म्हणजे प्रभाव पाडण्याची क्षमता होय."

5) प्रा. वाक्षरे आर. बी. यांच्या मते :- " आपले विचार व धोरण कृतीत आणण्यासाठी इतर राष्ट्रांना प्रभावीत करण्याची कला व क्षमता यांचा संगम म्हणजे राष्ट्रीय सत्ता होय."

राष्ट्रीय सत्तेच्या वरील सर्व व्याख्या राष्ट्रीय सत्तेचे स्वरुप स्पष्ट करतात. चार्ल्स मेरिय यांनी 1935 साली राजकीय सत्ता नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी एक स्वतंत्र राजकीय संकल्पना म्हणून सत्ता संकल्पना मांडली. कॅटलिन याने राज्यशास्त्राला सत्तेचे शास्त्र म्हटले. कोणत्याही राज्याचे (राष्ट्राचे) प्राथमिक आणि एकमेव अंतिम ध्येय आपल्या राज्याची सत्ता वाढवणे आणि ती टिकवण्याची असते. हॉब्जच्या मते सत्ता प्राप्तीची इच्छा निसर्गतःच मानवात असते

या इच्छेचा शेवट मृत्युनेच होतो. मॉर्गेन यांच्या मते सत्ता संघर्ष वैश्विक व अनुभवजन्य आहे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा तात्काळ उद्देश सत्ता प्राप्तीचाच असतो.

* राष्ट्रीय सत्तेचे निर्धारक घटक :-

आधुनिक काळात सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक राष्ट्राचे श्रेष्ठत्व सत्तेवरच अवलंबून असते. ज्या राष्ट्राची शक्ती अधिक असते ते राष्ट्र तीव्र गतीने आपले उद्देश साध्य करते. कोणत्या राष्ट्राची शक्ती / सत्ता किती आहे याचे निश्चित मोजमाप करता येत नाही. राष्ट्राच्या सत्तेची कल्पना त्या राष्ट्राकडे उपलब्ध असलेल्या राष्ट्रीय सत्तेच्या घटकावर व प्रत्येक घटकाच्या योग्य वापर करण्यावर निश्चित असतो.

1) भौगोलिक घटक :-

मॉर्गेन यांच्या मते देशाचे परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंध भौगोलिक स्थितीद्वारे निश्चित होतात. नेपोलियनच्या मते. देशाचे परराष्ट्र धोरण त्या देशाचा भुगोल ठरवतो. राष्ट्राच्या भौगोलिक स्थानात आकारमान (क्षेत्रफळ), हवामान व स्थान यांचा समावेश असतो.

जगामध्ये अनेक राष्ट्र आकाराने लहान व मोठी आहेत. आकारमानाच्या दृष्टीने रशिया जगात सर्वात मोठा आहे, तर व्हॅटीकन हे आकारमानाने जगात सर्वात लहान राष्ट्र आहे. आकारमान मोठा असलेला देश संरक्षण, नैसर्गिक साधन संपत्ती, लोकसंख्या, अन्नधान्य, खनिज संपत्ती इत्यादी दृष्टीने उपयुक्त असतो.

भौगोलिक दृष्ट्या सक्षम असलेल्या देशात अन्नधान्य व खनिज संपत्ती विपुल प्रमाणात असते ज्या देशाच्या भौगोलिक सिमा निसर्गनिर्मित साधनांनी परिपक्व असतात. तो देश संरक्षण सिद्धतेवर अधिक खर्च न करता विकास कामावर खर्च करतो. परिणामतः त्यान्ची राष्ट्रीय सत्ता अधिक बलशाली होते.

2) आर्थिक घटक :-

राष्ट्राची सत्ता वाढवण्यात आर्थिक घटकांची महत्वाची भुमिका असते. वर्तमानात राष्ट्राच्या सत्तेचे मोजमाप आर्थिक निकषाच्या आधारावर होत आहे. दोन देशांच्या संबंधाला आर्थिक स्वरुप प्राप्त झाले. प्रत्येक राष्ट्र संबंधाच्या माध्यमातून आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे. इंग्लंड, अमेरिका, रशिया, इटली, फ्रान्स, कॅनडा अशा विविध राष्ट्रांनी आर्थिकतेच्या साहयाने आपली सत्ता वाढवली आहे. याच स्पर्धेत भारत, चिन, ब्राझिल, दक्षिण आफ्रिका इस्त्राईल, इंडोनेशिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया अशा अनेक राष्ट्रांनी सहभाग घेऊन आपले प्रभूत्व सिद्ध केले.

3) नेतृत्व :-

राष्ट्राच्या सत्तेला वृद्धींगत करण्यात राजकीय नेतृत्वाचा वाटा महत्त्वाचा असतो. हिटलर, मुसोलिन, नेपोलियन बोनापार्ट, चर्चील, रुझवेल्ट, जॉर्ज बुश, व्लादीमर पुतीन, शिन जेपिंग, महात्मा गांधीजी, पंडीत नेहरु, इंदिरा गांधी, अटलबिहारी

वाजपेयी, नरेंद्र मोदी इत्यादी आंतरराष्ट्रीय स्थरा प्रभावी नेतृत्वाचा उल्लेख करता येतो या सर्व नेतृत्वांनी त्यांच्या काळात आपल्या राष्ट्राच्या सत्तेला अधिक मजबूत केले यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील राष्ट्रांचे महत्व वाढत आहे.

4) लष्करी क्षमता:-

लष्कर, अत्याधुनिक शस्त्र अस्त्रे, लष्करी तळे, अण्विक क्षेपणास्त्रे, युरेनियम इत्यादीचा समावेश राष्ट्राच्या लष्करी क्षमतेत होतो. लष्करी क्षमता युध्दामध्ये राष्ट्राच्या विजयाला आवश्यक असते. भूदल नवदल, आणि वायुदलांची प्रभावी संख्या, शस्त्रसज्ज सैनिकी प्रशिक्षण, आधुनिक शस्त्र अस्त्रे, कर्तव्यदक्षता, क्षेपणास्त्रे, अवकाशयान, जैविक व रासायनिक शस्त्रे, पाणबुड्या, अणुबाम, लढाऊ विमाने व अण्वस्त्रे. इत्यादी घटकांवर लष्करी क्षमता अवलंबून असते. लष्करी क्षेत्राशी संबंधित घटकातील प्रगतीमुळे राष्ट्र प्रबळ व शक्तीशाली बनते. परकीय आक्रमणा समर्थपणे तोंड देण्यासाठी राष्ट्राने लष्करी क्षेत्रात स्वयंपु राहणे आवश्यक असते.

5) लोकसंख्या:-

लोकसंख्या हा प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेचा मुख्य आधार आहे. राष्ट्राच्या सत्तेसाठी आवश्यक घटकांचे विभाजन भौतिक घटक व मानवी घटक असे केले जाते. यापैकी लोकसंख्या हा मानवी घटक आहे. लोकसंख्येचे प्रमाण किती असावे हे निश्चित नाही. परंतु ते संख्यात्मक आणि गुणात्म

दृष्टया महत्वाचे असते. प्लेटोने 5040 व ॲरिस्टॉटल ने 10,000 लोकसंख्या आदर्श राज्याच्या बांधणीसाठी आवश्यक असल्याचे सांगितले. लोकसंख्येच्या दृष्टीने मोठी असलेली राष्ट्र जगातील इतर राष्ट्रांवर आपला प्रभाव पाडू शकतात. परंतु अशा देशांचा भूभाग ही लोकसंख्येच्या प्रमाणात असावा. वाढत्या लोकसंख्येच्या मुलभूत गरजा पुर्ण करण्या इतपत संपन्न भूप्रदेश असावा. अन्यथा देशांतर्गत बेरोजगारी दारिद्र्य यासारखे प्रश्न निर्माण होऊन देश अस्थिर बनेल. अधिक लोकसंख्या असलेली राष्ट्र संरक्षणाच्या बाबतीत स्वयंपुर्ण असतात. राष्ट्राची लोकसंख्या सुशिक्षित, चारित्र्यसंपन्न, प्रशिक्षित, संशोधक, कर्तव्यदक्ष, राष्ट्रभक्त अशी असावी. जेणेकरुन मानवी संसाधन विकसित होईल. गुणात्मक दृष्ट्या अधिक संपन्न असलेल्या लोकांमुळे राष्ट्र पुगतशील बनते.

6) विचारसरणी:-

प्रत्येक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्राचे एक तत्वज्ञान व विचारसरणी असते. या विचारसरणीची जडणघडण त्या देशाची संस्कृती, इतिहास, परंपरा, धार्मिकता व नैतिकता इत्यादींच्या माध्यमातून घडत असते. या विचारसरणीचे स्वरूप सामाजिक, आर्थिक, धार्मिक नैतिक असु शकते. भांडवलवाद, समाजवाद, साम्राज्यवाद, उपयुक्ततावाद, उदारमतवाद, व्यक्तीवाद अशा विविध विचारसरणी आहेत. प्रत्येक राष्ट्र एका विचारसरणीचा आधार घेऊन राजकीय व्यवस्थेला अधिमान्यता मिळवून देते. विचारसरणी मानवी जीवन समाज व शासनाशी संबंधित विचारांचा समुह

आहे या विचारसरणीमुळे जनता, समाज व राष्ट्रां
प्रश्नाला सोडवून लोककल्याणाचा मार्ग सांगितला
जगात अनेक विचारसरणींनी आपला प्रभाव टाकला
आहे उदा:- साम्यवाद, फॅसीझम, नाझीझम, गांधी
मार्क्सवाद, राष्ट्रवाद, लोकशाही, लोकशाही
समाजवाद, अलिप्ततावाद, भांडवलवाद, सम
वाद, वसाहतवाद, साम्राज्यवाद इत्यादी.

अलिकडील काळात दहशतवाद, पर्यावरणवाद,
स्त्रिवाद, बहुसंस्कृतीवाद, उदारीकरण, जागतिकीकरण,
खाजगीकरण, विश्वराज्य, मानवतावाद अशा अनेक
विचारसरणी दोन देशांच्या संबंधाला प्रभावित करून
राष्ट्रीय निर्णयावर प्रभाव टाकून आपले हितसंबंध साध्य
करून घेतात.

7) नैसर्गिक साधनसंपत्ती :-

प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेला दिशा देण्यात नैसर्गि
साधनसंपत्तीचा महत्त्वाचा वाटा असतो. अन्नधान्य,
सोने, चांदी, कोळसा, लोखंड, युरेनियम, ॲल्युमिनिय
खनिजतेल, या सर्व नैसर्गिक साधनांचा विचार राष्ट्रा
ची सत्ता वाढविण्यासाठी केला जातो. प्रत्येक राष्ट्रातील
लोकसंख्येला पुरेसे अन्न अन्नधान्य आवश्यक असते
अन्नधान्य नसलेल्या राष्ट्रांना इतरांवर अवलंबून
राहण्याची वेळ येते. बाहेरील राष्ट्रांकडून अन्नधान्य
आयात करावे लागते. खनिज द्रव्यांच्या बाबतीत
कोणतेही राष्ट्र स्वयंपुर्ण नाही. परंतू अमेरिका व
रशिया या दोन देशांकडे नैसर्गिक साधनसंपत्ती
विपूल प्रमाणात आहे. लोखंड व कोळसा उत्पादनात
भारत अग्रेसर आहे. अरब राष्ट्रात पेट्रोलजन्य
पदार्थांचे साठे अधिक आहेत. या खनिज संपत्तीला

जमिनीतून बाहेर काढण्याची तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळाची क्षमता देशाकडे असावी लागते. तसेच या खनिज द्रव्याचा वापर राष्ट्रसत्ता व विकासासाठी करून घेता येतो. खनिज द्रव्याच्या मुबलकतेमुळे त्याची विक्री करून पसे परकीय चलनाचा साठा वाढवता येतो. आरोग्य, कृषी, व तंत्रज्ञानाशी संबंधित प्रगती करता येते.

४) तंत्रज्ञानातील प्रगती:—

२१ वे शतक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीचे शतक आहे. कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक व औदयोगि प्रगतीचा तंत्रज्ञान मुख्य आधार आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळेच अवकाश संशोधन, दळणवळण, संगणक, माहितीक्षेत्र अशा अनेक क्षेत्रात प्रगती करता येते. तंत्रज्ञानामुळेच कृषीक्षेत्र, आरोग्य, उदयोग, व्यापार, प्रशासन, शिक्षण, अभिव्यक्ती, आर्थिक व्यवहार, अशा अनेक क्षेत्रात प्रगती होत आहे. तंत्रज्ञानातील प्रगती युद्द साहित्याला प्रगत बनवते. तंत्रज्ञानातील प्रगती माहितीचा साठा वाढवते. तंत्रज्ञानातील प्रगती मानवीजिवन सुकर करते. तंत्रज्ञानातील प्रगती आर्थिक प्रगती करते. तंत्रज्ञानातील प्रगती लोकांचे वयोमान वाढवते. तंत्रज्ञानातील प्रगती लोकांना यंत्र बनवते.

वरील प्रमाणे राष्ट्राची सत्ता वाढवणारे घटक आहेत. बदलत्या काळानुसार या घटकांमध्ये बदल होत आहेत. आज माहिती तंत्रज्ञानातील प्रगती माहितीचा साठा, विविध भाषेची जाण, आर्थिक राजनय, कुशल व प्रशिक्षित लोकसंख्या, सेवा क्षेत्र असे विविध घटक राष्ट्राची सत्ता बलशाली करण्यात योगदा

न देत आहेत.

* राष्ट्रीय सत्तेच्या मर्यादा :-

जगातील प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेला मर्यादित करणारे काही घटक असतात या घटकांची विभागणी खालील दोन भागामध्ये करता येते.

1) अंतर्गत (राष्ट्रीय)
2) बहिर्गत / बाह्य (आंतरराष्ट्रीय)

वरील दोन्ही मर्यादांचा उल्लेख खालील प्रमाणे करता येतो.

1) राष्ट्रीय :-
- अस्थिर शासन
- प्रभावी नेतृत्वाचा अभाव
- अम अकार्यक्षम राजकीय नेते
- विविध सामाजिक राजकीय व धार्मिक गट
- आर्थिक परावलंबित्व
- सक्षम लष्कराचा अभाव
- मर्यादेपेक्षा अधिक वाढती लोकसंख्या
- बेरोजगारी
- प्रशासकीय दफ्तरदिरंगाई व वाढता भ्रष्टाचार
- नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभाव इत्यादी.

2) बाह्य मर्यादा :-
- संयुक्त राष्ट्र संघटना
- जागतिक बँक
- आंतरराष्ट्रीय नाणे निधी
- आंतरराष्ट्रीय कायदे
- आंतरराष्ट्रीय न्यायालय
- जागतिक लोकमत

- युद्ध
- सामुहिक सुरक्षितता
- सत्ता संतुलन.
- पर्यावरणीय संतुलन
- दहशतवादाचा प्रसार व निर्मुलन
- विविध प्रादेशिक संघटना

मोठ्या राष्ट्रापेक्षा लहान राष्ट्रावर अधिक मर्यादा व बंधने येतात कारण लहान राष्ट्रांना मोठ्या राष्ट्रावर अवलंबून राहावे लागते. मोठी राष्ट्रे छोट्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर व राजनयावर बंधने आणतात बऱ्याच वेळेस राष्ट्रांच्या आक्रमक प्रवृत्तीमुळे ही राष्ट्राच्या सत्तेवर बंधने येतात.

या सर्व बाह्य व अंतर्गत मर्यादा आणि बंधनांचा विचार करून राष्ट्र आपली सत्ता वाढवण्याचा प्रयत्न करतात.